शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
डॉ.ॲनी बेझंट रोड,मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २४५३१३९६ e-mail : doesecondary1@gmail.com

जा.क्र.अमाशा/शा.सुरु/२०२१/एस-१/१८७२ दिनांक : १४ जुन, २०२१

**प्रति,**

1. **विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व**
2. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व**
3. **शिक्षण उपनिरीक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर)**

**विषय** : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ सुरु करणेबाबत.

**संदर्भ** : १. या कार्यालयाचे पत्र क्र.अमाशा/शासू/एस-१/१५५८, दिनांक ३०.०४.२०२१
२. मा.मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे व्हि. सी. मधील संदेश दिनाक १४.०६.२०२१

उपरोक्त विषयी व संदर्भान्वये कळविण्यात येते की, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना संदर्भ क्र. ०१ नुसार दिनांक १४ जून २०२१ पर्यंत व विदर्भासाठी दिनांक २७ जून पर्यंत उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आली होती.

त्यानुसार दिनांक १५ जून, २०२१ पासून राज्यातील (विदर्भ वगळता) शाळांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यात येत आहे. विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष दिनांक २८.०६.२०२१ पासून सुरु होईल. शाळेमध्ये /कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पुढील प्रमाणे शिक्षकांची उपस्थिती आवश्यक राहील.

१. इयत्ता १ ली ते इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वीचे ५० टक्के शिक्षक उपस्थिती अनिवार्य राहील.
२. इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी चे १०० टक्के शिक्षक उपस्थिती अनिवार्य राहील.
३. शिक्षकेतर कर्मचारी यांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य राहील.
४. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी १०० टक्के उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीचा निकाल तयार करण्यासाठी मुल्यांकनाचे काम सूरु असून मर्यादित वेळेत सदर निकाल घोषीत करावयाचा असल्याने राज्यतील विदर्भासह इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीला शिकविणाऱ्या शिक्षकांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य राहील याबाबत सर्व संबंधित व्यवस्थापनांना सूचना निर्गमित कराव्यात.

बृहन्मुंबई शहरातील शिक्षकांच्या शाळा /कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती करीता त्यांना लोकलद्वारे प्रवासाच्या सोयीबाबत शासन स्तरावरुन यथोचित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

कोविड-१९ परिस्थितीमुळे पुढील सुचनेपर्यंत शाळा बंद असल्यातरी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे (SCERT) यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ऑनलाईन व इतर माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरळीतपणे सुरु राहील यांची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

याबाबत सर्व क्षेत्रीय यंत्रणांना वरीलप्रमाणे निर्देश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(द. गो. जगताप)**
शिक्षण संचालक
(प्राथमिक /माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१
३. खाजगी सचिव, मा.मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग, मुंबई -३२